# <u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग लोहमार्ग न्यायालय, पुणे यांच्या न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी एस.टी. सहारे)

<u>नियमित फौजदारी खटला क्र.४१/२०१३</u> <u>निशाणी क्र.७२</u>
**CNR No.MHPU**07-000062-2013

**महाराष्ट्र शासन मार्फत**
निरिक्षक
लोहमार्ग पोलीस ठाणे, पुणे. ... **<u>फिर्यादी</u>**

**<u>विरुध्द</u>**

**प्रशांत श्रीकांत गवळी उर्फ पऱ्या**
वय – २५ वर्षे, व्यवसाय – निरंक,
रा. ५७०, आंबेडकर नगर, मार्केटयार्ड झोपडपट्टी,
गुलटेकडी रोड, पुणे. ... **<u>आरोपी क्र.१</u>**

## <u>भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा</u>

## गुन्हा कबुली अन्वये न्यायनिर्णय
## (दिनांक २८/०३/२०१९ रोजी पारित)

आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ सह कलम ३४ नुसार दंडनिय गुन्हयाकरिता संपरिक्षा चालविण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.१ प्रशांत श्रीकांत गवळी उर्फ पऱ्या याने आज दिनांक २८/०३/२०१९ रोजी अभिलेखावर निशाणी क्र.७१ नुसार पुरसिस दाखल करुन त्याला गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. आरोपीस गुन्हा कबुलीबाबत विचारले असता, त्याने सांगितले की, तो स्वेच्छेने गुन्हा कबुल करीत असून त्याच्या परिस्थितीचा विचार करुन त्यास कमीत कमी शिक्षा करण्यात यावी. आरोपी इच्छापूर्वक गुन्हा मान्य करीत आहे किंवा नाही, याबाबत पडताळणी

करण्यात आली. आरोपी स्वेच्छेने गुन्हा कबुल करीत असल्याची मला खात्री झाली. त्याने सांगितले की, तो गरीब असून त्याच्याकडून अनावधानाने सदरचा गुन्हा घडला असून त्याच्यावर कोणताही गुन्हा प्रलंबित नाही.

३. आरोपीला भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ सह कलम ३४ मधील शिक्षेचे तरतुदीबाबत व परिणामाबाबत सांगण्यात आले. तरीसुध्दा त्याने गुन्हा कबूल करुन कमीत कमी शिक्षा करण्यात यावी, अशी न्यायालयास विनंती केली.

४. प्रकरणातील परिस्थितीबाबत आरोपी क्र.१ चा आणि विद्वान सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा ठोठावण्यात यावी, अशी न्यायालयास विनंती केली.

५. आरोपीचे म्हणणे ऐकले. त्याने तो गरीब असून त्याला कमीतकमी शिक्षा ठोठावण्याची विनंती केली. अभिलेखाचे अवलोकन केले.

६. आरोपी २५ वर्षांचा असून त्याच्यामागे त्याच्या परिवाराची जबाबदारी आहे, असे त्याने कथन केले. दस्तावेजांचे अवलोकन केले असता असे दिसते की, दिनांक १३/०१/२०१३ रोजी फिर्यादी संतोषकुमार केदारप्रसाद गुप्ता यांची डयुटी अप कन्याकुमारी रेल्वेगाडीवर पायलट म्हणून होती. त्याकरिता फिर्यादी दिनांक १२/०१/२०१३ रोजी २३.३५ वाजता सदर रेल्वेगाडीच्या इंजीनचा ताबा घेण्याकरिता रेल्वे रनिंगरुममधून इलेक्ट्रीक इंजीन लोको शेड (लॉबी) येथे रेल्वे लाईन मधून गुड्स कॅबीन नं.२ जवळून पायी जात होते. अंदाजे २३.४५ वाजताचे सुमारास त्यांचे समोरुन आलेल्या आरोपी क्र.१ ते ३ यांनी संगनमताने फिर्यादीस अचानक पकडले. आरोपींनी फिर्यादीच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील मोबाईल फोन व उजव्या बाजूच्या समोरील खिशातील पैशाचे पाकीट जबरदस्तीने काढून घेतले. फिर्यादीने आरोपींना प्रतिकार केला असता त्यातील एका आरोपीने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या गुढघ्यावर धारधार हत्याराने वार केला. फिर्यादीने आरडाओरड करताच तिघेही आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. सबब, फिर्यादीने त्यांना लूटमार करणाऱ्या आरोपींविरुद्ध लोहमार्ग पोलीस ठाणे, पुणे येथे फिर्याद दिली.

७. आरोपीच्या कथनानुसार तो गरीब आहे. परंतू, आरोपीने इतर आरोपींसह संगनमताने फिर्यादीस दुखापत करुन लुटमार केली. फिर्यादी त्यांचे कर्तव्यावर जात असतांना आरोपींनी अंधाराचा फायदा घेऊन फिर्यादीस धारदार शस्त्राने जखमी केले व त्यांचेजवळील

मोबाईल व पैशाचे पाकीट घेऊन पळून गेले. सदरची घटना रेल्वे परिसरात येणाऱ्या लोकांकरिता निश्चितच धोकादायक आणि जिवघेणी आहे. सदर घटनेमुळे फिर्यादीला गंभीर दुखापत झाली व त्यांचा मोबाईल व पैशाचे पाकीट चोरीला गेले, असे दिसते. असे असले तरी, आरोपीचे वय, त्याच्यावर असलेली कौटूंबिक जबाबदारी व घटना घडण्यास कारण, त्यास होत असलेला पश्चाताप व आरोपीची स्वेच्छेने गुन्हा कबुली या सर्व बाबींचा विचार करता आरोपीला खालीलप्रमाणे शिक्षा व दंड देणे माझे मते योग्य व न्यायोचित होईल. म्हणून खालील आदेश पारित.

## आदेश

१. आरोपी क्र.१ प्रशांत श्रीकांत गवळी उर्फ पऱ्या यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ सह कलम ३४ च्या गुन्हयात फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४१ नुसार दोषी ठरविण्यात येते.

२. भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ सह कलम ३४ या अपराधाकरिता आरोपीस १५ दिवस (पंधरा दिवस) साध्या कारावासाची शिक्षा व रक्कम रु.३,०००/- (रुपये तीन हजार) दंडाची शिक्षा ठोठाविण्यात येते. दंडाची रक्कम न भरल्यास पुन्हा १५ दिवस (पंधरा दिवस) साध्या कारावासाची शिक्षा ठोठाविण्यात येते.

३. आरोपी क्र.१ दिनांक १३/०३/२०१९ पासून ते आजपर्यंत अटकेत आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४२८ अंतर्गत तरतुदीनुसार त्याने अटकेत काढलेला कालावधी मुळ शिक्षेमध्ये धरण्यात यावा.

४. आरोपी क्र.१ चे जामीनपत्र व बंधपत्र रद्द समजण्यात यावे.

५. प्रकरणातील मुद्देमाल आरोपी क्र.२ च्या सुनावणीकरिता राखून ठेवण्यात यावा.

६. सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी.

*न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.*

---Sd---

(एस.टी. सहारे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

पुणे.
दि.२८/०३/२०१९

# प्र मा ण प त्र

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयामधील मजकुराप्रमाणे शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | अभिषेक अरुण गीते<br>लघुलेखक (श्रेणी III) |
| न्यायालयाचे नाव | – | एस.टी. सहारे<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग<br>लोहमार्ग न्यायालय, पुणे. |
| निकाल तारीख | – | २८/०३/२०१९ |
| पिठासीन अधिकाऱ्याने न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख | – | २८/०३/२०१९ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – | २८/०३/२०१९ |